# खासगी विकसकाने एसआरएकडे वळावे

## डॉ. नितीन करीर : १९२ सदनिकांचे झोपडपट्टीधारकांना हस्तांतरण

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांतील सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही आज झोपडपट्टीमध्ये राहाते. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर याही नागरिकांना चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे आणि याचसाठी खासगी विकसकांनी एसआरए प्रकल्पांकडे वळणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक खासगी विकसकाने किमान एक एसआरए प्रकल्प हाती घ्यावा, असे मत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी व्यक्त केले.



परिवर्तन या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन व सदनिका ग्राहकांना हस्तांतरणाचा कार्यक्रम डॉ. करीर यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत व रणजित नाईकनवरे, पालिका आयुक्त सौरभ राव, क्रेडाई नॅशनलचे अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, सभागृहनेते श्रीनाथ भिमाले, मशाल संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, परिवर्तन या प्रकल्पाचे वास्तुविशारद संदीप महाजन, नगरसेवक धीरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे, परिवर्तन प्रकल्पातील सदनिकांचे मालक सलीम पटेल, शिवाजी पारिटे व शाहीद पटेल उपस्थित होते.

नाईकनवरे डेव्हलपर्सच्या वतीने दांडेकर पुलाजवळ परिवर्तन प्रकल्पातील एक इमारत पूर्ण झाली असून, त्यातील १९२ सदनिका व ७ दुकानांचे हस्तांतरण करण्यात आले.

डॉ. करीर म्हणाले, क्रेडाई व महाराष्ट्र चेंबर ऑफ हाउसिंग इंडस्ट्री यांच्या सदस्यांनी किमान एक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेत शहराच्या विकासासाठी हातभार लावावा. तीन ते चार बांधकाम व्यावसायिक एकत्र येत एक एसआरए प्रकल्प हाती घेऊ शकतील. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (एसआरए) स्थापना १४ वर्षांपूर्वी झाली. त्यावेळी क्रेडाईने मशाल या संस्थेच्या मदतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये एक सर्व्हे केला गेला. मात्र त्यानंतर एसआरएने याचे गणित मांडीत ते विकसकांसमोर ठेवले नाही. विकसकाने एसआरए प्रकल्प आणल्यानंतर तो तपासत बसणे हे एसआरएचे काम नाही, तर नागरिक व विकसक यामध्ये त्यांनी पुलाचे काम करणे अपेक्षित आहे, असे त्यांनी सांगितले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.